**-: प्रेसनोट दिनांक- २७/१०/२०२१ :-**

आरोपी लोकसेवक सागर इरप्पा कोळी, वय ४३, पोलीस नाईक, ब.नं.५७९, नेमणूक - शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर, वर्ग -३, रा. श्रीरामनगर, उचगांव ता.करवीर जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.....

---

तक्रारदार यांचा जुन्या गाडया खरेदी विक्रीचा व्यवसाय असुन त्यांनी श्री नितीन कदम यांची इनोव्हा गाडी वापरणेस आणली होती. दि. २५/१०/२०२१ रोजी माकडवाला वसाहतीतील तानाजी व इतर लोकांनी नितीन कदम आमचे पैसे देणे बाकी आहे असे सांगून इनोव्हा गाडी जबरदस्तीन घेवुन गेले. त्यामुळे तक्रारदार हे मित्रासह शाहुपूरी पोलीस ठाणेस गाडी चोरीची तक्रार देण्यास गेले असता तेथे उपस्थित पोलीस नाईक सागर कोळी यांनी दोघांमधील वाद मिटवून इनोव्हा गाडी तक्रारदार यांना देणेस सांगितली. पोलीस नाईक कोळी यांनी तक्रारदार यांचेकडे इनोव्हा गाडी परत मिळवून देणेकरीता १५,०००/-रू ची मागणी करून तात्काळ १०,०००/-रू मागितल्याने त्यांनी ते दिले व उर्वरीत ५,०००/-रू घेवुन येण्यास सांगितले.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांची शाहुपूरी पोलीस ठाणेतील पोलीस नाईक श्री सागर कोळी यांनी ५,०००/- रू. लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरकडे प्राप्त झाली होती.

तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता पोलीस नाईक सागर कोळी यांनी ५,०००/-रू लाचेची मागणी करून ती लाच रक्कम तक्रारदार यांना घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झालेने त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक २६/१०/२०२१ रोजी शाहुपूरी पोलीस ठाणेच्या बाहेरील आवारात शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचे वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून देणेकरीता तक्रारदार यांचेकडून सापळा कारवाई अगोदर १०,०००/- रू दि.२५/१०/२०२१ रोजी स्विकारलेचे कबूल करून आजरोजी ५,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक सागर इरप्पा कोळी पोलीस नाईक ब.नं.५७९ नेमणूक शाहुपूरी पोलीस ठाणे, वय ४३, कोल्हापूर, वर्ग -३, रा. श्रीरामनगर, उचगांव ता.करवीर जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौंडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार श्री.सतिश मोरे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पो.हवा.अजय चव्हाण, पो.ना. कृष्णात पाटील, पो.कॉ.रूपेश माने, चालक/पोहेकॉ सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१
२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.
४)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner